अभिसरण

ISSN-2229-4856

# नव्वदोत्तर मराठी साहित्य

## चर्चा आणि मीमांसा

संपादक
प्राचार्य डॉ. वसंत सानप

कार्यकारी संपादक
डॉ. गणेश मोहिते

सहसंपादक
डॉ. मनोहर सिरसाट

| | | | |
|---|---|---|---|
| २० | 'आले ढग... गेले ढग' मधील सामाजिक प्रश्न | डॉ. एम.ए.कव्हळे | १०१ |
| २१ | कृषिव्यवस्थेतील वर्तमान वास्तव : 'या परावलंबी दिवसात' | डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे | १०४ |
| २२ | साहित्यकृती आणि चित्रपट निर्मिती | प्रा.डॉ.धोंडगे एम.बी.<br>कांदे केशव अंगदराव | १०९ |
| २३ | चरित्र -आत्मचरित्र : स्वरूप व संकल्पना | डॉ. सुनीता अंबादास बोराडे | ११२ |
| २४ | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कवितेला दिशा देणारी कविता: पिढीपेस्तरप्यादेमात | प्रा.बाळू मोहन तिखे | ११६ |
| २५ | "लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातून चित्रीत झालेले राजकीय वास्तव" | प्रा. संदीप परदेशी | १२० |
| २६ | लोककला तमाशाचे बदलते स्वरूप | तुकाराम हरिश्चंद्र देवकर<br>प्रो. एम. बी. धोंडगे | १२४ |
| २७ | ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा | प्रा. लक्ष्मण गित्ते | १२७ |
| २८ | स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीत्वाचे दर्शन | कैलास मच्छिंद्रनाथ होके<br>प्रा.डॉ. बाळासाहेब जाधव | १३१ |
| २९ | जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी दलित कथा | प्रा.डॉ. संजय राजधर महाले | १३६ |
| ३० | 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी' (विशेष संदर्भ : 'साखरफेरा') | प्रा. महारूद्र सूर्यभान जगताप | १४२ |
| ३१ | दलित जाणिवा शब्दांकित करणारी निसर्गार्कीत कविता : मोहाडी | प्रा.डॉ.प्रल्हाद दत्तराव भोपे | १४६ |
| ३२ | प्रा. वामन निंबाळकर : मूल्याधिष्ठित जाणिवा आविष्कृत करणारा मोठा कथालेखक | प्रोफेसर डॉ. मनोहर सिरसाट | १५२ |
| ३३ | मानवी प्राक्तन शब्दबद्ध करणारी कविता- काळी माती निळे आभाळ | डॉ. गणेश मोहिते | १५५ |
| ३४ | मार्ग कादंबरीतील पर्यावरणवादी विचार | प्रा.सौ. विलिना इनामदार | १६० |
| ३५ | "1990 नंतरच्या कथेचा अभ्यास" | प्रा. डॉ. शंकर शिवाजी मुंडे | १६९ |
| ३६ | मोतीराज राठोड यांच्या वैचारिक साहित्यातील विमुक्तांचे जीवनमूल्ये | डॉ. आकाश ब. पवार | १७४ |

# चरित्र -आत्मचरित्र : स्वरूप व संकल्पना

डॉ. सुनीता अंबादास बोराडे
मराठी विभाग
बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड, ता. जि. बीड
मो. ९४२०६५५५०७
ई-मेल – saborade507@gmail.com

## ०१. प्रास्ताविक

लेखक तुमच्या आमच्या सारखाच एक माणूस असतो. तो साहित्य निर्माण करतो. म्हणजे त्याला जे काही जाणवते तेत्याला नवीन वाटत असते. ते लेखणीतून उतरविले पाहिजेभाषेच्या द्वारे तो शब्दबद्ध करीत असतो.ही निर्मिती त्याच्या अनुभवाचा भाग असते. त्याने जे जीवन भोगलेले असते ते त्याच्या शब्दातून व्यक्तहोत असते तो जे जीवन अनुभवतो. ते त्याचे स्वत:चे असले तरी समाजाशी निगडीत असते.समाजात राहूनच त्याने हे अनुभव घेतलेले असतात. त्यातूनच तो बरे वाईट अनुभव घेत असतो.साहित्याकडे प्रतिभाशक्ती किंवा कल्पनाशक्ती इतरांच्यामानानेअधिक असते. साहित्यकृतीमध्येसाहित्यिक जे नवीन विश्व निर्माण करीत असतो तेत्याचा एकट्याच्या अनुभवावर आधारीत असते.

मराठी वाङ्मयात काव्य, कथा, कादंबरी, नाटक, निबंध इत्यादी प्रकाराप्रमाणेच चरित्र व आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराला महत्वाचे स्थान आहे. मराठी वाङ्मय निर्मिती काळापासून या साहित्यप्रकाराची चर्चाआहे.चरित्र हे एका व्यक्तीने दुसऱ्या विषयी केलेले तरआत्मचरित्रहे लेखकाने स्वतः विषयी सांगितलेले असते.अशा चरित्र व आत्मचरित्र वाङ्मयच्या स्वरूप वैशिष्ट्याविषयी अनेकांनी आपापली मते मांडली आहेत.

मराठी वाङ्मयाच्या निर्मिती काळापासून चरित्र व आत्मचरित्र लेखनाची परंपरा दिसून येते.उदा. 'लीळाचरित्र' या ग्रंथामध्ये श्रीचक्रधराचे चरित्र गोष्टी रूपाने विशद केलेआहे तरसंत बहिणाबाई यांनी आपल्या अभंगातून आत्मचरित्र मांडले आहे.१९ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत राजे, महान व्यक्ती, संत यांचे उपदेश किवा प्रबोधनात्मक कथा, अभंग यातून त्यांची चरित्र किवा आत्मनिवेदने आढळून येतात.

जन्मापासून मृत्यूपर्यंत सुसंगत व सलग वर्णन असेलच याची खात्री देता येत नाही. मराठी साहित्यात आत्मचरित्र या वाङ्मयाप्रकाराचे स्थान स्वातंत्र आहे. त्याला दीर्घ अशी परंपरा आहे. अनेक वळणे घेत आलेला हा वाडमयाप्रकार आज मराठी साहित्याच्या प्रवाहात बरासा स्थिरस्थावर आणि मान्यताप्राप्त झालेला आहे. अनेक अभ्यासकरांनी या वाङ्मय प्रकाराचे वैशिष्टे आणिवेगळेपण दाखवण्यासाठी प्रयत्न केलेला आहे.

चरित्र आणि आत्मचरित्र हे साहित्य प्रकार म्हणून ब्रिटिश राजवट भारतात स्थिर झाल्यानंतर प्रचलित झाले.पूर्वी आत्मचरित्र हा वेगळा साहित्यप्रकार न समजता त्याच्या समावेश चरित्रात केला जात होता.

डॉ. सदा कुऱ्हाडे म्हणतात,'आत्मचरित्र हा चरित्राचा एक प्रकार आहे, मात्र या साहित्यप्रकारात विपूल प्रमाणात लेखन होऊ लागल्याने आत्मचरित्र हा वेगळा साहित्य प्रकार म्हणून मानला जाऊ लागला.

**०२. चरित्र-आत्मचरित्र: संकल्पना व काही व्याखा**

**२.१.चरित्रशब्दाचा अर्थ:**

'चरित्र' हा शब्द संस्कृत 'चर' धातूपासून तयार झालेला आहे.तो नाम म्हणूनहीवापरता येतो 'चरित' चा अर्थ चाललेला असा होतो तर 'चरित्र' नाम म्हणून घेतले तर चाललेले अंतर चाललेल्या स्थितीगतीचा आलेख असा अर्थ घेता येतो .

इंग्रजीमध्ये'biography' हा शब्द चरित्रासाठी वापरलेला असून त्यात "एखाद्या माणसाची दुसऱ्या माणसाने लिहिलेली जीवनकथा "असा अर्थ अभिप्रेत आहे.

एका व्यक्तीच्या जीवनात घडलेल्या वृतांत म्हणजे चरित्र होय. चरित्रम्हणजे व्यक्ती आत्मिक विकासाचा इतिहास होय. (ऑक्सफोर्ड कोश)

'चरित्र'म्हणजे एका व्यक्तीच्या जीवनाचा विकास इतिहास होय.चरित्रामध्ये तत्कालीन इतिहासाचे दर्शन होत असते.इतिहासामध्ये ज्या प्रमाणे देश प्रातांचे आर्थिक व्यवहार सामाजिक चळवळी, धार्मिक विकास राजकीय उलथापालथी यांचे वर्णन तसे चरित्राही त्या व्यक्तीचे सर्वांगीण विकासाचेच चित्र पाहावयास मिळते.

"इतिहास या नावाने जो वाङ्मय प्रकार ओळखला जातो तो भिन्न असला तरी 'चरित्र' हा एक प्रकारे इतिहास आहे तितके खरे आहे."(प्रा.अ. म. जोशी)

**०३. चरित्र-आत्मचरित्र: पार्श्वभूमी**

भारतीय साहित्यात 'चरित्र' या साहित्यप्रकाराची ओळख ब्रिटिश राजवटीनंतर झाली असे म्हटले जाते. मात्र 'चरित्र' किंवा 'चरित' हा शब्द भारतीयांना माहीत नव्हता असे नव्हे. भारतात ब्रिटीशपूर्व काळातील'हर्षचरितम','उत्तररामचरित' हे संस्कृतमधील तसेच 'लीळाचरित्र' हे मराठीतले शब्दआपल्याला पाहावयास मिळतात. हे ग्रंथ 'चरित्र' या साहित्यप्रकारात समाविष्ट करता येऊ शकत नाही.

मराठीतील चरित्रवाङ्मय१२-१३ व्या शतकातील महानुभव वाङ्मयात सापडण्यासारखे आहे. हे खरे असले तरी मराठीतील इतर वाङ्मयाप्रमाणे चरित्रवाङ्मयाची वाढ प्रामुख्याने इंग्रजी आमदानीनंतरच झालेली आहे. यावरून चरित्र हा साहित्यप्रकार म्हणून आपणपाश्चात साहित्याच्या संपर्कात आल्यानंतर त्यांच्याकडून स्वीकारला आहे व विकसित झालेला आहे असे म्हणता येते.

नव्वद नंतरच्या काळामध्ये विविध क्षेत्रातीलव्यक्तींची आत्मचरित्रे ही प्रकाशित झालेली दिसतात. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक,राजकारण, शैक्षणिक, संस्कृतिक, औद्योगिक क्षेत्रातील या अशा विविध व्यक्तींनी आत्मचरित्रे लिहिलेली आहेत.उदा. यशवंतराव गडाख यांचे'अर्धविराम',भाऊसाहेब थोरात यांचे 'अमृतमंथन', रावसाहेब शिंदे यांचे ' ध्यासपर्व', मोहन धारिया यांचे 'बोलअनुभवाचे',ग. प्र. प्रधान यांचे'माझी वाटचाल', दत्ता प्रधान यांचे 'मी दत्तूचा दत्ता कसा झालो',पांडुरग अभंग यांचे 'शेतमळा ते विधानसभा', शरद पवारयांचे 'लोक माझे सांगाती' हे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यात त्यांनी आपल्या जीवनामध्ये घडलेल्या घटना तसेच राजकारण,समाजकारण आणिशैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातही देखील मोलाची कामगिरी केलेली दिसते तसेच सर्वसामान्याचे जीवन वाट्याला आलेले असतांना प्रतिकूल परिस्थिवर मात करून

सर्वसामान्यासाठी समाजासाठी बहुमोल असे कार्य केलेले दिसते त्यांचे हे सर्व आत्मचरित्र वाचल्यानंतर आपणांस जाणवते आणि त्यांनी आपले हे आत्मचरित्र ते उच्च दर्जाचे झालेले दिसून येते.

०४. मराठीवाङ्मयप्रकारातील आत्मचरित्राची वैशिष्टे

या लेखन प्रकारचेकाही प्रभाव आहेत आत्मचरित्राची या वाङ्मय आपले स्वतःचे सिद्ध करून स्व तचा एक वाङ्मयीन घाट  ही निर्माण झालेला दिसतो आत्मचरितरची प्रभाव पाहत असताना आत्मचरित्र हे आत्मप्रदर्शनीय,आत्मसमर्थन आणि आत्मप्रौढी यातून अलिप्त राहिली पाहिजेत आणितटस्थपणे तटस्थ वृत्तीने ने आपले जीवनातील अनुभव अभिव्यक्त केले पाहिजे असे हे प्रभाव वैशिष्टे मानता येते आपल्या आयुष्यातील अहंकाराचे आपल्याभूमिकेतूनच समर्थन आणि प्रदर्शन आत्मचरित्रकाराने करणे योग्य नाही अभिव्यक्ती प्रांजळपणे यक्त झाली पाहिजेत म्हणजेच प्रांजलपण हे देखील आत्मचरिताचे वैशिष्टे म्हणता येईल. सत्यकथन हे एक आत्मचरित्राचे वैशिष्टे म्हणता येईल कारण कोणत्याही वाङ्मयकृतीमधून कल्पनाविलासने लेखक रसिक यांना आनंद मिळत नसतो तर त्यातून वास्तव जीवनाचे चित्रण आले पाहिजे या दृष्टीने आत्मचरित्राचा आत्मा ठरत असतो.

सत्याशिवाय आत्मचरित्राला सौंदर्यार्त्मक कलाकृतीचा दर्जा ही गाठता येत नाही आपले अनुभव सत्य स्वरुपात प्रकट करणे हेच आत्मचरित्राचे महत्वपूर्ण असे वैशिष्टे मानता येते आपल्या सहवासातील व्यक्ति स्वभाव हे एकअसेच वैशिष्टेआहे कारण आत्मचरीत्रा मध्ये स्व हा महत्वाचा घटक असल्या मुळे आपले लेखन चाललेले दिसते त्यामुळे लेखकाचे जीवन ज्या समाजातवातावरणामध्ये घडते.त्या समाजात आणि वातावरणातील त्याच्या सहवासातील व्यक्ती ,त्यांच्याशी निर्मिले गेलेले भावसबंध आणि अनुबंध हे मौलाचे असतात आपल्या आयुष्यात आलेल्या व्यक्तीचे संस्कार चांगले वाईट अनुभव त्यांचे स्वभाव यांचे चिंत्रण 'आत्मचरित्र' त स्वं वर अन्याय न करता प्रकट होत असतात.

घटना प्रसंगाची कलात्मक मांडणी करणे असे देखील आत्मचरित्राचे वैशिष्टे ठरविता येते उदा. लक्ष्मीबाई टिळकयांचे'स्मृतिचित्र' आणि गो. नी. दांडेकर यांचे स्मरणगाथा असेअनेक प्रकारचे आत्मचरित्र विशेष सांगता येतात त्यातून आपल्या जीवनाचे अनुभव हेप्रकट होताना दिसतात.

स्व:ता चे अस्तित्व टिकवण्यासाठी चरित्राबरोबर आत्मचरित्रचा जन्म झाला आपल्या जन्मापासुन विठ्ठलप्राप्तीपर्यंत सर्व प्रसंग नामदेव अभंगात असल्याने 'नामदेव'हे मराठीतील पहिले आत्मचरित्रकार मानले जातात परंतु अभंग हे आत्मविषकराचे माध्यम असल्याने त्यांनी आपली सर्व सुख-दु:खेविठोबाला अर्पण केलेली दिसतात म्हणून त्यांची आत्मचरित्रे आत्मचरित्र वाङ्मयप्रकार डोळयासमोर ठेवून लिहिलेली दिसत नाही.

इंग्रजी वाङ्मयाचा संपर्कामुळे या वाङ्मय प्रकाराचा खरा विकास झालेला दिसतो स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे  १८७१मध्ये दादोबांनी बांधणे आपले आत्मचरित्र लिहिले आणि ते रूढ अर्थाने पाहिले आत्मचरित्र म्हणून मराठी वाङ्मयाचा इतिहास आणि मान्य केलेले दिसते परंतु आत्मचरित्रही आपला वेळ जावा आपली करमणूक व्हावी दुसऱ्यास आपण आपला पराक्रम सांगून त्यास भारावून टाकवे आपले दुःख दुसऱ्याला सांगावे आत्मशोध घ्यावा आपल्या जीवनापासून दुसऱ्याला बोध मिळेल अशा विविध हेतूने आत्मचरित्रेही लिहिले गेलेले दिसतात

चांगली कलाकृती निर्माण करण्यासाठी लागणारी तनमनता आत्मचरित्रा  इतकी दुसरा कोणत्याही वाडमय प्रकारात येऊ शकत नाही म्हणूनच आत्मचरित्र प्रकार लिहिण्यासाठी सोपा उपाय उत्तम अशा प्रकारचा दिसतो

## संदर्भसूची


1. आनंदयादव: 'आत्मचरित्र' मीमांसा मेहता पब्लिशिंग हाऊस पहिली आवृत्ती फेब्रु.१९९८ पृ. २
2. बोरगावकरव.रा.: प्राचीन मराठीवाङ्मयातील चरित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक लेखनाचा समीक्षात्मक अभ्यास[मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद ] पृ.१३२
3. भालेरावविमल: आधुनिक मराठीवाङ्मयातील आत्मचरित्र एक अभ्यास [१९१०-१९७५] साहित्य प्रसार केंद्र सीतावर्डे,नागपूर, पहिली आवृत्ती मार्च १९८६ पृ. ९०
4. जोशी अ.म.:'चरित्र' आत्मचरित्र [तंत्र आणि इतिहास] सुविचार प्रकाशनमंडळ, दुसरी आवृत्ती एप्रिल १९६५ पृ ९०
5. पांगारकर ल.रा.: 'चरित्र चंद्र' पांगारकर प्रकाशन, नाशिक १९३९ पहिली आवृत्ती पृ.५७
6. जोशी अ.म.: 'उनि' ९१
7. देशपांडेअ. ना. : प्राचीन मराठीवाङ्मयाचा इतिहास उत्तरार्ध प्रकाशन पुणे, १९६१ पृ.१०८